
ISSN 2249-4081
RNI.MAHMUL 02935/2011

*National Registered and Recognized*
*Research Journal Related to Higher Education for Economics & Commerce*

# GLOBAL
## ECONOMIC RESEARCH



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

156

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Disaster Management and Rehabilitation in India | Dr. Eknath J. Helge | 1-7 |
| 2 | Diagnosing Financial Health: A Study of Selected Indian two Wheeler Companies | Dr. V. R. Gawhale | 8-15 |
| 3 | Role of Msmes in Development of India | Dr. P. N. Sagar | 16-24 |
| 4 | Investment Behavior of Individual Investors in Capital Market | Dr. Balaji Kamble | 25-31 |
| 5 | Global Recession and Banking System | G. C. Wadwale | 32-36 |
| 6 | Sez In India : An Engine of Economic Growth Through Investment , Export and Employment | Bajarang N. Jadhav, Dr. H. H. Uliveppa | 37-42 |
| 7 | जागतिकीकरणाचे अव्हान व भारतीय बँकिंग व्यवसाय | डॉ. व्ही. आर. गव्हाळे | 43-46 |
| 8 | भारतीय वित्तीय बाजारातील व्यक्तिगत गुंतणूकदारांच्या समस्या | डॉ. बालाजी कांबळे | 47-52 |
| 9 | भारतातील भाववाढ : परिणाम आणि भाववाढ नियंत्रण | डॉ. अशोक पुरभाजी टिपरसे | 53-60 |
| 10 | श्रम - प्रतिष्ठा आणि आर्थिक विकास | गंगाधर चिमाजी वडवळे | 61-64 |

Vol. II, Issue : IX
GLOBAL ECONOMIC RESEARCH Half Yearly Research Journal ISSN 2249-4081
April 2015 To Sept. 2015 53

# भारतातील भाववाढ : परिणाम आणि भाववाढ नियंत्रण

**डॉ. अशोक पुरभाजी टिपरसे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड

## RESEARCH PAPER - ECONOMICS

9

**सारांश**

*गेली काही वर्ष ग्राहक मुल्य निर्देशांकानूसार भाववाढण्याचा दर सातत्याने दोन अंकी राहीला आहे त्यातही पुन्हा खायन्नातील भाववाढ लक्षणिय प्रमाणात जास्त असल्याचे निर्देशनास येते. परंतु कोणत्याही राजकीय पक्षाने या वाढत्या भाववाढीच्या विरोधात चक्कार शब्द काढलेला नाही, जनआंदोलन उभारणे दुरच राहीले. भारतातील भाववाढीचा दर असाच चढा राहीला तर अंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची गुणवत्ता श्रेणी एक पायरी कमी होईल.भारतामध्ये खायन्नाच्या किंमती मध्ये सातत्याने वेगाने भाववाढ होते आहे. देशातील कोटयावाधी लोक धान्य परवडत नाही म्हणून अर्ध पोटी राहतात आणि सरकार धान्याची निर्यात करुन परकीय चलन मिळवित आहे. भारतामध्ये सुरु असणारी आर्थिक प्रक्रियां आणि तिला वळण देणारे राजकर्त्यांचे धोरण हा एक मोठा फार्स ठरत आहे. आर्थिक वाढीचा दर 2011-12 या वर्षांत 6.2 टक्के होता. तो घसरुन 2012-13 वर्षात 5 टक्के झाला अशा रितीने आर्थिक बाबीच्या दरात घसरण सुरु असताना म्हणजे दरडोई उत्पादनातील वाढ घसरणीला लागलेले असताना जीवन उपयोगी वस्तूंची भाववाढ वर्षाला 12 टक्केच्या समीप यवुन पोहचली आहे. 2010 - 12 या तीन वर्षात चलन वाढीचा दर भारतात सर्वाधीक राहीला आहे. 2010 साली 10.5 टक्के 2011 मध्ये 8.5 टक्के आणि 2012 मध्ये 8.2 टक्के एवढा होता. गोल्डमन सक्सच्या अर्थशास्त्रज्ञाने तयार केलेल्या BRIC गटात ब्राझील (B), रशिया (R), भारत (I), चीन (C) भारतातील भाववाढीचा दर सर्वाधीक आहे.*

158

भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसवणा-या तीन प्रमुख समस्या म्हणजे भाववाढीचा उच्चतम दोन अंकी दर, चालू खात्यावरील वाढती तुट ( Current Account Deaficit ) आणि पायाभूत सुविधांची कमतरता या होत. या तीन समस्यांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने यशस्वी प्रयत्न सुरु होत नाहीत तो पर्यंत आर्थिक वाढीचा दर संभाव्य दरापेक्षा खालच्या पातळीवरच राहणार हे वास्तव आहे.

Keywords : भाववाढ का होते, भाववाढीचा कल, भारतातील भाववाढीची सद्यस्थिती, भाववाढीचे कारणे, परिणाम आर्थिक सुधारणेनंतरची भाववाढ

सध्याच्या पैसाधिष्टित जागतिक अर्थव्यवस्थेत विकसनशील देशाप्रमाणे विकसित देशात देखील भाववाढीचा प्रश्न दिसून येतो तथापि विकसनशील देशात समस्येने सध्या अतिशय उग्र रुप धारण केले आहे. साधारणतः भाववाढ ही आर्थिक समस्या समजली जाते. पण हा प्रश्न देशाच्या आर्थिक विकासाप्रमाणे सामाजिक नीती व राजकीय स्थैर्य यांच्याशी निगडीत आहे. भाववाढीसाठी आर्थिक सामाजिक व राजकिय कारणे कारणीभूत आहेत. या समस्येमुळे आर्थिक विकासाला बाधा पोहचते तर विकसनशील देशात सामाजिक तणाव व राजकीय अस्थैर्य निर्माण होऊ शकते विकसनशील देशातील लोकशाही राज्यप्रणाली धोक्यात येऊ शकते.

वस्तू व सेवांचे पैशात व्यक्त केलेले मूल्य म्हणजे किंमत होय भाववाढीच्या काळात देशातील सर्वसाधारण किंमत पातळी वाढत असते. तथापी वाढलेल्या किमतीची एक अवस्था म्हणजे भाववाढ नव्हे तर किंमती वाढत जाण्याची ती एक प्रक्रिया होय. एकाचवेळी चलनपुरवठा वाढ आणि किंमत वाढ घडून येत असते म्हणून मुद्रेचे मुल्य कमी होत जाण्याची स्थिती असे भाववाढीचे वर्णन केले आहे.

सदर शोधनिबंध हा पुर्णतः दुयम साधनसामग्रीवर आधारीत असून यासाठी वर्तमान पत्रातील भावाढीसंदर्भातील तज्ञांचे विविध लेख, जर्नल्स व मासिकांमधून प्रकाशित झालेले लेख, पीएच.डी.प्रबंध, विविध संकेतस्थळांवरील माहिती इ.चा संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे.

भाववाढीची व्याख्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी मांडण्याचा प्रयत्न केला, पण त्यातील कोणतीही व्याख्या परिपूर्ण आहे असे मात्र म्हणता येत नाही. चलनसंख्यामान सिध्दांताच्या मते व देशातील खरेदी माध्यमात होणारी वाढ म्हणजे भाववाढ होय." अशाच प्रकारचा विचार अर्थशास्त्रज्ञ हॉट्रे यांनी मांडला, त्यांच्या मते "वाजवी पेक्षा जास्तीचा रोख पैशाचा पुरवठा म्हणजे भाववाढ होय."भाववाढ : भाववाढ म्हणजे अशी अवस्था कि जेव्हा पैशाचे मूल्य घटत जाते, म्हणजेच किंमती वाढत असतात.

थोडक्यात भाववाढीचे महत्वाचे लक्षण म्हणजे वस्तूंच्या किमतीतील सतत वाढ हे होय, त्यामुळे चलन संख्या हे भाववाढीचे कारण असू शकते पण चलनसंख्येतील वाढ म्हणजे भाववाढ असू शकत नाही. अनेकदा चलन संख्येतील वाढ ही भाववाढ असतेच असे नाही. कारण पैशाच्या साठयात कसलाही बदल झाला नाही किंवा तो स्थिर

राहिला तरीही वस्तूंच्या किमतीत वाढ होते.

**भाववाढीच्या मापन पध्दती :**

1. घाऊक किमतीचा निर्देशांक
2. ग्राहक किमतीचा निर्देशांक

भारतातील भाववाढ मोजण्यासाठी घाऊकं किंमत निर्देशांकाचा (Whole Sale Price Index) वापर केला जातो. वस्तू आणि सेवांच्या किंमत बदलाच्या सरासरीच्या आधारे घाऊक किंमत निर्देशांक काढला जातो. सध्या भारतात घाऊक किंमत निर्देशांक काढण्यासाठी विविध 676 वस्तूंच्या किंमत पातळींचा विचार केला जातो. यासाठी पायाभूत वर्ष म्हणून 2004-05 हे आधार वर्ष निवडण्यात आले आहे. घाऊक किंमत निर्देशांक काढताना निवडलेल्या 676 वस्तूंचे विविध गटात व उपगटांत विभाज करण्यात आले आहे. प्रत्येक वस्तूला यामध्ये विशेष भार देण्यात आलेला आहे. यामधील गटनिहाय भार खालील प्रमाणे आहेत.

1. प्राथमिक वस्तू -(Primary Articles) भार – 20.11%
2. इंधन, वीज, प्रकाश साहित्य, वंगण (Fuel, Power, Light & Lubricants) - भार 14.91%
3. औदयोगिक वस्तू (Manufactured Products) - भार 64.97%

प्राथमिक वस्तू गटांचे अन्न (Food Articles) अन्नाव्यतिरिक्त वस्तू ((Non Food Articles) आणि खनिज (Minerals) इ उपगटांमध्ये विभाजन केले जाते. 2004-05 पासून प्राथमिक वस्तू गटांचे विभाजन 1. अन्न वस्तू, (Food Articles) 2.अन्न सोडून इतर वस्तू (Non Food Articles) 3. इतर अन्न वस्तू (Other Food Articles – e.g. tea and coffee) 4. इतर अन्नाव्यतिरिक्त वस्तू (Other Non Food Articles – e.g. hides, sugarcane, tobacco etc.) 5. खनिज (Minerals) या 5 उपगटांत केले जात आहे. उत्पादित वस्तू गटाचे अन्न वस्तू पेय, तंबाखू आणि तंबाखू उत्पादने, कापड, लाकूड आणि लाकूड उत्पादने, कागद आणि कागद उत्पादने, कातडे आणि कातडी वस्तू, रबर आणि प्लॅस्टिक वस्तू, रसायने आणि रासायनिक वस्तू, खनिज वस्तू , धातू वस्तू, यंत्रे आणि यंत्र साहित्य , वाहतूक साधने, इतर किरकोळ उत्पादित वस्तू इ. विविध उपगटांमध्ये विभाजन केले जाते. अशा प्रकारे प्रमुख गटांना व उपगटांना वेगवेगळे भार देवून भारतात घाऊक किंमत निर्देशांक काढला जातो.

याव्यतिरिक्त भाववाढ मोजण्यासाठी ग्राहक किंमत निर्देशांकांचा (Consumer Price Index) देखील वापर केला जातो. ग्राहक स्तरावरील महागाईचा दर काढण्यासाठी अशा निर्देशांकाचा वापर मजूर, शेतकरी, कारागीर यांचा मजूरी दर अथवा महागाई भत्ता ठरविण्यासाठी ग्राहक किमत निर्देशांक काढताणा वस्तू व सेवा असा

160

Vol. II, Issue : IX
GLOBAL ECONOMIC RESEARCH
Half Yearly Research Journal
ISSN 2249-4081
April 2015 To Sept. 2015 

दोन्हीचा विचार करतात ग्राहक किंमत निर्देशांक हा प्रत्यक्ष नागरीकाला तोंड दयावा लागणा-या आरसाच असतो. त्यामुळे त्याला cost of living index असे म्हणतात. सध्या या निर्देशांकाच्या आधारे संयुक्त राष्ट्रे, इंग्लंड, जपान इ. विकसित देशांमध्ये भाववाढ मोजली जाते.

देशातील ग्राहक किंमत निर्देशांक 5 टक्क्यांच्या सुरक्षित पातळीवर कायम राहणे आवश्यक असताना तो 10 टक्याच्या आस पास अजूनही आहे.

**चलन वाढीचे प्रकार**

| | |
|---|---|
| रांगणारी creeping | चलनवाढीचा वार्षीक सरासरी दर तीन टक्यापर्यंत असणे. |
| चालणारी walking / trotting | चलनवाढीचा वार्षीक सरासरीचा दर तीन ते दहा टक्यापर्यंत असणे |
| पळणारे Runing / Galloping | चलनवाढीया वार्षीक सरासरी दर दहा ते वीस टक्यापर्यंत असणे |
| बेसुमार Hyper/ Runaway/ Astronomical | चलनवाढीचा वार्षीक सरासरी दर वीस टक्यापेक्षा जास्त असणे. |

**भाववाढ का होते :**

वस्तुची किंवा सेवेची किंमत त्या वस्तू व सेवेच्या मागणी - पुरवठयावरुन ठरत असते. आणि जेव्हा पुरवठयापेक्षा मागणी अधिक असते, तेव्हा वस्तूच्या किंमती वाढतात. आणि मागणी पुरवठयातील हे अंतर जेवढे वाढत जाते तेवढया किंमती वाढत जाऊन महागाई भडकते. मागणी - पुरवठयात अशी विषमता निर्माण होण्यास अनेक आर्थिक तसेच आर्थिकेत्तर मानवनिर्मित कारणे जबाबदार असतात. तोच महागाई किंवा किंमत वाढीची कारणे असतात.

स्वातंत्र्योत्तर कालावधीत भारतातील भाववाढीचा जो अनुभव आला त्याचा आढावा घेतल्यास भयावह भाववाढ विध्वंसक भाववाढ हा प्रकार फारसा घडलेला नाही. 1991 च्या दरम्यान झालेली 17 टक्के भाववाढ ही भाववाढीची या देशातील सर्वाधिक मर्यादा (रेंज) आहे असे दिसून येते.

अर्थात या बाबतीत ही लक्षात घेणे आवश्यक आहे की, भाववाढ 4 टक्के च्या आत येणे किंवा 10 टक्के च्या वर जाणे या दोन्ही गोष्टी समाजाच्या आर्थिक आरोग्याच्या दृष्टीने घातक आहे. प्रा. आर्थर लेविसच्या मते चत गुंतवणूक उत्पादनवाढ यासाठी आवश्यक तो नफा मिळवण्यासाठी 4 ते 6 टक्के भाववाढ होणे आवश्यक आहे.

**भारतातील भाववाढीची सद्यस्थिती**

भारतातील भाववाढीच्या मागील 10 वर्षातील 2003 ते 2012 चढउतारासंदर्भातील सांख्यिकीय माहिती तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र. 1

**भारतातील भाववाढीचे वर्षनिहाय दर**

| वर्ष | भाववाढीचा दर | फरक | |
|---|---|---|---|
| | | वाढ | घट |
| एप्रिल, 2003 | 5.12 | - | - |
| एप्रिल, 2004 | 2.23 | - | 2.89 |
| एप्रिल, 2005 | 4.96 | 2.73 | - |
| एप्रिल, 2006 | 4.65 | - | 0.31 |
| एप्रिल, 2007 | 6.67 | 2.02 | - |
| एप्रिल, 2008 | 7.81 | 1.14 | - |
| एप्रिल, 2009 | 8.70 | 0.89 | - |
| एप्रिल, 20010 | 13.33 | 4.63 | - |
| एप्रिल, 20011 | 9.41 | - | 3.92 |
| एप्रिल, 20012 | 10.22 | 0.89 | - |
| जून, 2012 | 10.5 | - | 0.17 |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, भारतात साधारणपणे भाववाढीचा दर सातत्याने वाढत आहे. मागील वर्षाची चालू वर्षाशी तुलना करता फक्त वर्ष, 2004 (2.89%), 2006 0.31%) व 2011 (3.92%) या वर्षातच भाववाढीचा दर घटलेला आहे. उर्वरित सर्व वर्षामध्ये भाववाढ दर वाढलेला दिसून येतो. सर्वाधिक भाववाढ दर 2010 (13.33%) मध्ये होता. 2009 च्या तुलनेत 2012 मध्ये (4.63%) नी अधिक भाववाढ झालेली दिसून येते, तर 2011 मध्ये 2010 च्या तुलनेत (3.92%) नी भाववाढ दर घटलेला दिसून येतो. भारतातील भाववाढीच्या दराच्या बदलत्या स्वरुपाचे चित्र तक्ता क्र.1 मधून स्पष्टरित्या समजून येते.

**भाववाढीचे कारणे :**

1. सरकारने जनतेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड केल्यास जनतेकडील विनियोगक्षम उत्पादनात वाढ होते उपभोग्य वस्तूवरील खर्च वाढतो, मागणी घटते.
2. शीघ्र गतीने वाढणा-या लोकसंख्येमुळे गरजा वाढतात, मागणी वाढते.
3. निर्यातीत वाढ वस्तूच्या साठयात घट होते, पुरवठा कमी होतो.
4. उत्पादक घटकांची टंचाई होते.
5. नैसर्गिक आपत्ती कृषी उत्पनाच्या पुरवठयातील विपरीत परिणाम होतो. उत्पादनात घट होते.
6. वस्तूंची साठेबाजी कृत्रिम टंचाई निर्माण होते.
7. चलन पुरवठयात सतत तीव्र स्वरुपाची वाढ
8. कृषी व औदयोगिक क्षेत्रात उत्पादनाची असमाधानकार स्थिती.
9. पेट्रोलियम इतर मुळ वस्तू, खादय व खाते हयांच्या आयात किंमतीत झालेल्या वाढीचा प्रभाव.

10. उत्पादक व उपभोक्ते हयांच्या किंमत वाढीच्या अपेक्षा.

11. लोकसंख्येचा वाढता दबाव : 1951 मध्ये 36.1 कोटी असलेली लोकसंख्या सतत वेगाने वाढत जाऊन 31 मार्च 2011 ला 121 कोटी होती.

12. सतत वाढत जाणारा सरकार खर्च : 1950-51 मध्ये केंद्रसरकार व राज्यसरकार हयांचा एकुण खर्च 740 कोटी रुपये होता तो सतत वाढत जाऊन 1999-2000 मध्ये 5,69,400 कोटी रु. झाला. केवळ विकासावरील खर्च वाढला असे नसुन विकासेत्तर खर्चही वाढला. सध्या किंमतीत सतत होणा-या मोठया प्रमाणावरील वाढीचे प्रमुख कारण सतत वाढत असलेला सरकारी व्यय होय.

13. तूटीचे अर्थप्रबंधन व मुद्रा पुरवठयात वाढःचौथ्या योजनेपासून व नंतरच्या काळात तूटीचे अर्थप्रबंधन वेगाने वाढू लागले.

14. काळया पैशाच्या प्रभाव व भ्रष्टाचारः सरकारी अनुमानानुसार 1983-84 मध्ये काळा पैसा 37,000 कोटी रु. होता. 1999-2000 मध्ये 60,000 कोटी रु. काळया पैशाचे अनुमान होते. काळया पैशाचे अस्तित्व व त्याच्या कुप्रभाव हयामुळे स्फितीकारी प्रवत्ती सतत वाढत आहे.

15. प्रशासित किंमतीत वाढ : सार्वजनिक क्षेत्रातील उदयोगही आपली उत्पादने व सेवा हयांच्या किंमती सतत वाढवित होते. हयात इतर उदयोगांना पुरविण्यात येणारा कच्चा मालही समाविष्ट होता

**भाववाढीचे परिणाम :**

1. चलनमुल्यात घर - सार्वजनिक बचत करण्यास लोक निरुत्साहित होतात.
2. देशी, विदेशी गुंतवणूकीत घट
3. जास्त मागणी मुळे वस्तूच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष होते.
4. जीवनावश्यक वस्तूंच्या उदयोगाकडून चैनीच्या वस्तूच्या उदयोगांकडे परावर्तन होते. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूच्या उत्पांदनात घट होते.
5. ऋणकोला (कर्जघेणारा) फायदा, तर धनकोला कर्ज देणारा नूकसान होते.
6. वेतन आणि मंजूरी मिळणारा वर्ग खर्च वाढतो, पगार वाढत नाही यामुळे नुकसान होते.
7. सामाजिक दृष्टया अन्यायकारक भाववाढीमुळे उत्पादनात आणि संपतीचे पुर्नवितरण श्रीमंताकडे होते.
8. वाढता भ्रष्टाचार लोकांची वैयक्तिक आणि सामाजिक नैतिकता ढासळते.

**भाववाढीचे नियंत्रण व उपाय :**

1. बँक दरात वाढ : यामुळे कर्ज महागतात, कर्ज घेण्यची प्रवृत्ती कमी होते, चलन पुरवठा नियंत्रित होते.
2. खुल्या बाजारात सरकारी कर्जरोख्याची विक्री - चलन पुरवठें नियंत्रित होतो.
3. रोख निधीच्या प्रमाणात वाढ - यामुळे वाढ पतनिर्मितीच्या क्षमतेवर मर्यादा पडते.

4. करारोपण - सरकार प्रचलित करांच्या दरात वाढ करते आणि काही नवीन कर आकारते यामुळे लोकांची खरेदी शक्ती कमी होते.
5. उर्ध्वमूल्यन : यामुळे निर्यातीत घट होते. देशात पुरवठा वाढतो
6. उत्पादनात वाढ : मागणी कमी होते. किमतीही कमी होतात
7. वेतन धोरण नियंत्रित ठेवले पाहिजे
8. किमतीच्या उच्चतम मर्यादा ठरविणे - यामुळे जीवनावश्यक वस्तूच्या किमती नियंत्रित ठेवता येतील.
9. आर्थिक विकासाची गती वाढवणे, अर्थव्यवस्थेची उत्पादनशक्यता वाढवणे व सर्वांना विकासाच्या समान संधी उपलब्ध करुन देणे अशी समाजव्यवस्था निर्माण करावी लागेल. मूठभर श्रीमंत व मध्यमवर्गीयांना लागणा-या वस्तू उत्पादनावर अधिक भर देण्याऐवजी सर्वसामान्यांना लागणा-या वस्तू उत्पादनावर भर देणारे शेती, उदयोग व सेवाविकासाचे माध्यम, लघु व कुटीर उदयोग धोरण स्वीकारावे लागेल. खाजगी अथवा सार्वजनिक क्षेत्रात व प्रशासनात कुटुंबातील स्त्री अथवा पुरुषापैकी फक्त एकास नोकरी दणे, शेती, उदयोग अथवा व्यवसायातून कुटुंबास पुरेसे उत्पन्न मिळणारांना नोकरी देण्याचे कटाक्षाने टाळणे, यामुळे आर्थिक विषमता, दारिद्रय, बेकारी इ. समस्या कमी करता येतील. व याद्वारे भाववाढीच्या मूळावर प्रहार करता येईल.
10. वाढत्या सामाजिक अपप्रवृत्ती म्हणजे लाचलुचपत, भ्रष्टाचार, तस्करी, काळाबाजार, साठेबाजी स्वार्थी प्रवृत्ती व करचुकारपणा इ. नियंत्रित कराळ लागतील. त्यामुळे काळया पैशाच्या रुपाने राष्ट्रीय उत्पन्न पातळीला होणारी गळती थांबविता येईल. यासाठी केवळ कायदे करुन भागणार नाही तर त्या कायदयाची प्रभावी अंमलवजावणी आवश्यक आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे सामाजिक अपप्रवृत्तीव समाजानेच वहिष्कार टाकणं आवश्यक आहे.
11. राजकीय स्थैर्य हा भाववाढीवरील सर्वात महत्वाचा उपाय विकसनशील देशांच्या व प्रामुख्याने भारताच्या वावतीत दिसून येतो. यासाठी राजकारणी लोकांना सत्तेचा हव्यास त्यागावा लागेल. केवळ देशभक्ती प्रेरित राज्यकर्तेच देशाच्या आर्थिक विकासाची ठाम भूमिका घेऊ शकतात. विकासाची कायमस्वरुपी धोरणे राबवता येतात व समाजातील अपप्रवृत्ती नाहीश्या करण्यात राज्यकर्ते यशस्वी होऊ शकतात काळा पैसा निर्मितीचे मार्ग शोधण्याचे व देशातील प्रचंड प्रमाणावरील काळा पैसा बाहेर काढण्याचे प्रयत्न सरकार केल्यास या काळया पेशाच्या जोराव चालणारे सरकारच सत्तेवरुन खाली खेचले जाईल अशी परिस्थिती असलेल्या देशात राजकीय स्थैर्य आणि प्रभावी सरकारचे महत्व पटते. या परिस्थितीत भाववाढ नियंत्रणाचे इतर उपाय निरर्थक ठरणे फारसं आश्चर्यकारक नाही.

164

## संदर्भ सूची

1. शिंदे एम.एन. (1991) अलिकडच्या काळातील भारतातील भाववाढीचे स्वरुप योजना 1 ते 15 मार्च
2. मासिक योजना विविध अंक (1992,2008,2010,2013)
3. अर्थसंवाद विविध खंड (2012,2013)
4. भारतीय अर्थव्यवस्था - राजन कोळंबे (2014)
5. www.inflation.in/inflation-notes/inolsa

**ज्योतिचंद्र पब्लिकेशन, लातूर.**

**ISBN नंबर नुसार पुस्तक प्रकाशनाची सुवर्ण संधी**

**वैशिष्ट्ये :-**

१) विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व इतर लेखकांचे पुस्तक 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर ISBN नंबर नुसार प्रकाशित करणे.

२) संशोधक, प्राध्यापक यांच्या M.Phil, Ph.D. संशोधनात्मक पुस्तकांना विशेष प्राधान्य.

३) यु.जी.सी. च्या नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार उच्च शिक्षणामध्ये कार्यरत संशोधनार्थी व प्राध्यापक यांना आपले पुस्तक ISBN नुसारच प्रकाशित करणे आवश्यक आहे. तरी, संशोधनार्थी व प्राध्यापक यांनी आपले मौलिक साहित्य ISBN नुसार प्रकाशित करून घ्यावे, ही विनंती.

**- संपर्कासाठी पत्ता -**

प्रकाशक,
ज्योतीचंद्र पब्लिकेशन
"ग्यानदेव-पार्वती", R-9/139/6, विशाल शाळेजवळ,
एल.आय.सी. कॉलनी, प्रगती नगर, लातूर.
ता. जि. लातूर - 413531.
**ऑफिस फोन नं. - 02382 - 241913**
मो. नं.9423346913, 9503814000, 9637935252, 7276301000

165